# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
**५३९, राजेंद्रनगर, कोल्हापूर-४१६ ००४.**

दुरध्वनी क्र-०२३१-२६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com


क्र.कोविमं/उमा/प्रात्य/ऑनलाईन/3714
कोल्हापूर ४१६ ००४
दिनांक :- ०३/१२/२०२४

प्रति,
प्राचार्य,
सातारा, सांगली, कोल्हापूर
क. महाविद्यालये.

**विषय - उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२५ "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) आणि "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षेबाबत...**

**संदर्भ - १) राज्य मंडळाचे पत्र क्र.रा.मं./ऑनलाईन/आय.टी./जी.के./ ४६०८, दिनांक २९/११/२०२४.**

उपरोक्त विषयाच्या संदर्भिय पत्रास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) या विषयाची परीक्षा दिनांक १२ मार्च २०२५, दि.१५ मार्च २०२५ व १७ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.३० आणि दुपारी ०३.०० ते ०५:३० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास ३० मिनिटे या कालावधीची राहील.

तसेच"सामान्यज्ञान"(जी.के.) विषयाची परीक्षा दिनांक १५ मार्च २०२५,१७ मार्च २०२५ व १८ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० आणि दुपारी ०३.०० ते ०५.०० याप्रमाणे सकाळच्या व दुपारच्या सत्रात प्रत्येकी २ तास या कालावधीची राहील. याबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

**केंद्रसंचालक/पर्यवेक्षक/नियुक्ती व परीक्षेचे साहित्य जमा करण्याबाबत व परीक्षेबाबतच्या सूचना-**

"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) व "सामान्यज्ञान" (जी.के.) विषयाच्या ऑनलाईन परीक्षा संचालनाबाबत परीक्षा केंद्र संचालक, पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यक यांच्या नेमणूका आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या स्तरावर करण्यात याव्यात व त्यांची नावे मंडळ कार्यालयाकडे पाठवून देण्यात यावीत. सदरच्या नेमणूका करीत असताना केंद्र संचालक व पर्यवेक्षक हे आय.टी. विषय न शिकवणारे असावेत याची नोंद घ्यावी. तसेच तांत्रिक सहाय्यक हे आय.टी. विषय शिकवणारे असावेत. त्यांची नावे **१० फेब्रुवारी २०२५** पूर्वी या कार्यालयाकडे पाठवावीत

"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषय शिकविला जाणाऱ्या प्रत्येक कनिष्ठ महाविद्यालयांची संगणक प्रयोगशाळा व संगणक यंत्रणा परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. सदर परीक्षा ज्या ठिकाणी "माहिती तंत्रज्ञान" (आय.टी.) विषय शिकवण्यास मान्यता दिलेली आहे, अशा कनिष्ठ महाविद्यालयातच घेण्यात येईल. **("माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषय घेतलेल्या नियमित परीक्षार्थ्यांसाठी फक्त "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी त्यांचे कनिष्ठ महाविद्यालय हेच परीक्षा केंद्र राहिल)** या विषयासाठी विद्यार्थी त्यांच्या लेखी परीक्षा केंद्रावर (प्रसंगानुरूप) न जाता कनिष्ठ महाविद्यालयात जातील. तसेच पेपरची वेळ संपावयाच्या वेळेस कनेक्टीव्हीटी खंडीत झाली असेल तर पेपरची वेळ संपताच विद्यार्थ्यांनी दिलेली उत्तरे आपोआप सादर होतील. याबाबत विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयांनी सूचना द्याव्यात. अंध, अपंग इत्यादी संवर्गातील विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेप्रमाणे सवलत मान्य राहील व या विद्यार्थ्यांसाठी माहिती तंत्रज्ञान परीक्षेची वेळ ३.२० तासांची व सामान्यज्ञान परीक्षेची वेळ २.४० तासाची राहील.

**तांत्रिक व्यत्ययामुळे किंवा अन्य कारणामुळे परीक्षा देवू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत करावयाची कार्यवाही तसेच परीक्षेसाठी नियुक्त केलेल्या विभागीय मुख्य व सहाय्यक समन्वयक यांची माहिती.**

या परीक्षा कालावधीत जे विद्यार्थी तांत्रिक व्यत्यय वा अन्य कारणामुळे निर्धारीत वेळापत्रकानुसार परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांच्यासाठी खास बाब म्हणून सर्व परीक्षा केंद्रावर "माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विषयासाठी दि. १८.०३.२०२५ सकाळी ११.०० ते ०१.३० व दुपारी ०३.०० ते ०५.३० या दोन सत्रामध्ये व सामान्यज्ञान विषयासाठी दि.१९.०३.२०२५ रोजी सकाळी ११.०० ते ०१.०० व दुपारी ०३.०० ते ०५.०० या दोन सत्रांमध्ये पुनर्परीक्षेची संधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.ज्या विद्यार्थ्यांची उपरोक्त कारणास्तव परीक्षा होणार नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयांनी"माहिती तंत्रज्ञान"(आय.टी.) विद्यार्थ्यांची

माहिती दि. १७.०३.२०२५ व "सामान्यज्ञान" (जी.के.) विद्यार्थ्यांची माहिती दि १८.०३.२०२५ रोजीच्या दुसऱ्या सत्रा पर्यंत विभागीय मंडळ कार्यालयातील विभागीय तांत्रिक सहाय्यक समन्वयकांना कळविणे आवश्यक आहे. दिनांक १७.०३.२०२५ व दिनांक १८.०३.२०२५ रोजी होणाऱ्या पुनर्परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारण्यात येऊ नये.

मार्च २०२५ परीक्षेपासून गोपनीय साहित्य,तसेच गोपनीय सूचना ऑनलाईन स्वरुपात खालील दिलेल्या संकेतस्थळावर क.महाविद्यालयांच्या स्वतंत्र login वर उपलब्ध करुन देण्यात येतील.

**माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) - http://examinfo.mh-hsc.ac.in/**

**सामान्यज्ञान (जी.के.) - https://gk.mh-hsc.ac.in/**

विभागीय मंडळ कार्यालयाकडून खालील विभागीय समन्वयक व जिल्हा समन्वयकांची नेमणुक केली असून त्यांचे नाव, कॉलेजचे नाव, मोबाईल नंबर यांची माहिती देण्यात आली असून,ऑनलाईन परीक्षेबाबत काही तांत्रीक अडचणी आल्यास त्यांच्याशी संपर्क करावा.

**विभागीय समन्वयक**

१) श्रीमती.सुषमा शिवगोंडा पाटील - डी.आर.के.कॉलेज ऑफ कॉमर्स,कोल्हापूर (J २३.०९.००४)
मो.नं.-९८२३६६७८५५

**सातारा जिल्हयासाठी समन्वयक**

२) श्री. विशाल रामचंद्र शिंदे - मुधोजी हायस्कुल ॲण्ड ज्यु कॉलेज,फलटन (J २१.०८.००४)
मो.नं.-९९७५०७८६५०

३) श्री किरण वसंत शिंदे - किसनवीर महाविद्यालय,वाई,ता.वाई,जि.सातारा. (J२१.११.००१)
मो.नं. -९४२२६०४३२५

४) श्री सतीश संपतराव चव्हाण - केसीटी कृष्णा स्कूल ॲण्ड ज्यु कॉलेज कराड ,ता.कराड,जि.सातारा. (J२१.०२.०१७) मो.नं. -९७६६६०१६७७

**सांगली जिल्हयासाठी समन्वयक**

५) श्री.धनाजी शामराव शेवडे - न्यु इंग्लिश स्कुल ॲण्ड ज्यु. कॉलेज,शिराळा,जि.सांगली (J २२.०९.००९)
मो.नं.- ९८५०४३०९१७

६) श्री. शांतीनाथ चौगोंडा पाटील - माईर्स,विश्वशांती गुरूकूल स्कूल,मौजे डिग्रज रोड,सांगली (J २२.०६.०२४)
मो.नं. -८६६८८०३७४२ /९७६६६५८७६९

**कोल्हापूर जिल्हयासाठी समन्वयक**.

७) श्री. वायकसकर बी.एम. - आजरा महाविद्यालय,आजरा(J२३.०१.००१)
मो.नं. ९२२५८०३७३६ / ९०४९६३५६३७

८) श्रीमती गडगे ज्योती शंकर - न्यु मॉडेल इंग्लिश स्कूल ॲण्ड ज्यु. कॉलेज ,कोल्हापूर (J२३.०९.०२७)
मो.नं. - ९०२८७४८१५६

९) श्री. कांबळे निलेश दिलीप - श्री. आण्णासाहेब डांगे आर्टस, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, हातकणंगले.(J.२३.०६.०२२) मो.नं.९५२७८९९६८६

समन्वयकांनी ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा निर्धारित कालावधीत पूर्ण झाली नाही अशा कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती मुख्य समन्वयक श्रीमती सुषमा पाटील यांना <u>ई -मेल</u> व्दारे कळवून विद्यार्थ्यांची परीक्षा घेणेबाबत त्यांच्याशी संपर्क करावा.

(सुभाष रा. चौगुले)
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर.